सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ११२ | सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. चंद्रकांत सोनार
पत्रकार, धुळे



सौ. नीता महाले
शिक्षिका



श्री. कौस्तुभ जोशी
इंजिनिअर, पुणे



श्री. दीपक गणेशराव पाटील
माजी शहर उपाध्यक्ष, भाजपा

# अमळनेर पालिका, खा. शि. मंडळ संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान

## 'व्हॉईस ऑफ मीडिया'तर्फे सोहळ्याचे आयोजन : पत्रकार, वृत्तपत्र विक्रेत्यांचा मोफत आरोग्य विमा, जनजागृतीपर पत्रकाचे प्रकाशन



अमळनेर : कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, भैरवीताई पलांडे- वाघ, अॅड. सौ. ललितताताई पाटील, सौ. तिलोत्तमाताई पाटील, सौ. रिताताई बाविस्कर, मोहन सातुते, डॉ. डिगंबर महाले, हरी भिका वाणी, भोजूशेठ माहेश्वरी, विनोद अग्रवाल, जयेशकुमार काटे, कल्पेश महाले, उमेश काटे.



अमळनेर : खा. शि. मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष विनोद अग्रवाल यांचा सत्कार करताना माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील.



अमळनेर : नवनिर्वाचित नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांचा सत्कार करताना डॉ. डिगंबर महाले.



अमळनेर : कार्यक्रमास उपस्थित खा. शि. मंडळाचे व पालिकेचे नवनिर्वाचित पदाधिकारी.



अमळनेर : पशू- पक्ष्यांविषयी जनजागृतीपर माहिती पत्रिकेचे प्रकाशन करताना माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, कल्पेश महाले, अॅड. ललितताताई पाटील, डॉ. डिगंबर महाले, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, भोजूशेठ माहेश्वरी.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जगातील ५८ देशांत आणि देशात क्रमांक १ ची म्हणून लौकिकप्राप्त असलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडिया' या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या येथील शाखेतर्फे पालिकेचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, गटनेते, स्वीकृत नगरसेवक तसेच ख्यातनाम खान्देश शिक्षण मंडळ या संस्थेच्या नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त व कार्यकारी मंडळ सदस्यांचा श्री मंगळग्रह मंदिरात रविवार, दि. ११ जानेवारी रोजी यथोचित सन्मान करण्यात आला.

'व्हॉईस ऑफ मीडिया'चे प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले या सोहळ्याचे उद्घाटक होते. तर माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील अध्यक्षस्थानी होते. माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, ज्येष्ठ नेत्या अॅड. सौ. ललितताताई पाटील, सौ. तिलोत्तमाताई पाटील, भाजयुमोच्या उपाध्यक्षा भैरवीताई पलांडे- वाघ, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सौ. रिताताई बाविस्कर, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, नगरसेवक साहेबराव पवार, प्रविण गंगाराम पाटील, नगरसेविका योगिता पाटील, सौ. कल्पना परदेशी, कविता राजपूत, शोभाताई गढरे, सौ. नंदा संदानशिव, सुवर्णा हटकर, इर्शाद तडवी, रूपाली शिवदे, देवेंद्र कांबळे, विजय पाटील, सचिन पाटील, छायाताई पाटील, स्वीकृत नगरसेवक मोहन सातपुते, प्रताप साळी, गोपाल मोरे, विजय शॉपीचे संचालक भोजूशेठ माहेश्वरी, खान्देश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष कमल कोचर, श्रीमती माधुरीताई पाटील, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, संचालक हरी भिका वाणी, प्रदीप अग्रवाल, नीरज अग्रवाल, योगेश मुंदडे, पंकज मुंदडे, जितेंद्र जैन, डॉ. संदेश गुजराथी, संचालिका सौ. लीनाताई पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, मुख्याधिकारी आर. जी. चव्हाण, 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे जिल्हाध्यक्ष कल्पेश महाले आदी प्रमुख मान्यवर व्यासपीठावर होते. तर या सन्मान सोहळ्याचे आपण साक्षीदार व्हावे, या उद्देशातून अमळनेरमधील विविध क्षेत्रांतील मान्यवर, श्री मंगळग्रह मंदिराचे सेवेकरी तसेच 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या विविध शाखांचे पदाधिकारी व सदस्य यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अमळनेर : कार्यक्रमास उपस्थित खा.शि. मंडळाचे नवनिर्वाचित संचालक योगेश मुंदडे, जितेंद्र जैन, पंकज मुंदडे आदी.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री मंगळग्रह देवतेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांचा 'व्हॉईस ऑफ मीडिया'तर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. 'प्रजाराज्य न्यूज'च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन झाले. तसेच अमळनेर बाजार समितीचे सभापती अशोक आधार पाटील यांच्यातर्फे शहरातील पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांचा आरोग्य विमा काढण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. त्याचप्रमाणे पत्रकार धनंजय सोनार यांनी 'भूतदया हीच खरी ईश्वर सेवा' हे ब्रीद असलेल्या मुक्या पशू- पक्ष्यांचे काय? असे आवाहन करणाऱ्या जनजागृतीपर पत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

'व्हॉईस ऑफ मीडिया'चे तालुकाध्यक्ष उमेश काटे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.


### दिनविशेष
१२ जानेवारी

- नाटककार गोविंद बल्लाळ देवल लिखित शारदा नाटकाचा पहिला प्रयोग इंदूरमध्ये झाला.
- मिकी माऊस कार्टून प्रथम प्रकाशित झाले.
- हिराकुड धरणाचे उद्घाटन झाले.
- स्पेस शटल प्रोग्राम : केनेडी स्पेस सेंटरमधून STS-54 लाँच झाल्यामुळे तिसऱ्यांदा अंतराळात जाण्यासाठी एन्डेव्हर- स्पेस शटल तयार झाले.
- पुणे-मुंबई दरम्यान शताब्दी एक्स्प्रेस ट्रेन सुरू झाली.
- के.जी. बालकृष्णन यांनी भारताचे 37 वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

### क्षेत्र कोणतेही असो, मनभेद नको : डॉ. डिगंबर महाले



निवडणूक कोणतीही असो ती छोटी नसून मोठीच असते. निवडणुकीत वाद-विवाद होत राहतात. मात्र, निवडणूक संपली की सारे काही संपते. राजकारण, प्रशासन म्हटले म्हणजे मते-मतांतरे होत राहतील. मात्र, मनभेद होऊ नयेत. खान्देश शिक्षण मंडळ आपल्या शहराचे नाक आहे. श्रीमंत प्रताप शेठजींनी या संस्थेची जी पायाभरणी केली तिचा देशभरात लौकिक आहे. आपण आता कुठल्या एका प्रभागाचे नाहीत. कुठल्या एका पक्षाचे नाहीत. सर्व अमळनेरकरांचे आहोत, ही भावना ठेवून विकासकामे करावीत. सर्वांनी एकजुटीने कामाला लागून शहराच्या विकासासाठी प्रयत्नशील राहावे. आपल्या शहराची प्रगती ही

### निवडणूक संपली, आता कामाला लागू : नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर




पालिकेची निवडणूक आता संपली आहे. वृत्तपत्र हे लोकशाहीच्या प्रक्रियेत चौथा आधारस्तंभ मानले जाते. त्यामुळे समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन नेहमी सकारात्मक असतो. ही सकारात्मकता कायम राहावी, यासाठी कोणतेही वृत्तांकन करताना ते एकाच बाजूने न करता समोरच्याचीही बाजू त्यात मांडणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने समाजाला लोकशाहीच्या माध्यमातून न्याय मिळाल्याचे समाधान लाभेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच अमळनेरचा विकास हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून सर्वांना सोबत घेऊन कार्य करू, अशी ग्वाही याप्रसंगी देतो.

### सर्व पदाधिकाऱ्यांकडून एकसंघतेची अपेक्षा : भैरवीताई पलांडे- वाघ



अमळनेर पालिका आणि खान्देश शिक्षण मंडळ या दोन्ही अमळनेरकरांचा 'श्वास' असलेल्या संस्था आहेत. या संस्थांमध्ये विविध क्षेत्रांतील मंडळी पदाधिकारी म्हणून लाभली असल्याने या दोन्हीही संस्थांद्वारे अमळनेरचा सर्वांगीण विकास कसा साधला जाईल, याकडे एकसंघतेतून पदाधिकाऱ्यांनी लक्ष द्यायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त करत खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांनाही हेच आपल्याकडून अभिप्रेत आहे. या उद्देशातूनच जणू 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकारांच्या संघटनेने हा अतिशय अनोखा व अभिनव सन्मान सोहळा आज घडवून आणला आहे.

### अमळनेरकरांची स्वप्नपूर्ती व्हावी : अॅड. सौ. ललितताताई पाटील




अमळनेर पालिका गेल्या नऊ वर्षांपासून प्रशासक राजवटीमुळे जणू वनवासात होती. संपूर्ण विकास थांबल्याची स्थिती शहरातील जनतेने अनुभवली आहे. आता अमळनेरकरांवर लादलेली करवाढ तसेच खुंटलेला विकास पूर्ण करून जनतेचे स्वप्न साकार करण्यासाठी पालिकेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी गट-तट विसरून एकदिलाने काम करणे गरजेचे आहे. तसेच साने गुरुजींची कर्मभूमी असलेल्या अमळनेरमधील ख्यातनाम खानदेश शिक्षण मंडळ या संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनीही संस्थेच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देत अमळनेरचे नाव आणखी पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

### अमळनेरकरांचा विश्वास जपावा : सौ. तिलोत्तमाताई पाटील



अमळनेर पालिका व खानदेश शिक्षण मंडळ या दोन्हीही संस्था जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या मानल्या जातात. या निवडणुकीत श्री मंगळग्रह देवता व अमळनेरकरांनी कृपाशीर्वाद दिल्यानेच आपली खऱ्या अर्थाने या संस्थांमध्ये पदाधिकारी म्हणून निवड झाली, हे आपण सर्वांनी मान्य केले पाहिजे. त्यामुळे आपण सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी या दोन्हीही संस्थांच्या माध्यमातून अमळनेरचा शैक्षणिक व सर्वांगीण विकास कसा साधला जाईल, याकडे लक्ष द्यावे. 'व्हॉईस ऑफ मीडिया' या संघटनेने अमळनेरकरांच्या स्वप्नपूर्तीकरिता या सन्मान सोहळ्याच्या माध्यमातून अतिशय चांगला विश्वास आपणावर दर्शविला आहे.

### पालिका आणि खा. शि. महत्वपूर्ण : कषिभूषण साहेबरावदादा पाटील



अमळनेरकरांसाठी पालिका आणि खा.शि.मंडळ या दोन्ही संस्था अतिशय महत्वाच्या आहेत. अमळनेरच्या विकासात आणि नावारूपाला आणण्यासाठी या दोन्ही संस्थांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण असते. आता पालिका व खा. शि. मंडळ या संस्थांतील सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी एकदिलाने संघटितपणे काम करून अमळनेरचा सर्वांगीण विकास साधावा. व्हॉईस ऑफ मीडियाने पालिका व खा.शि. मंडळाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या केलेला सत्कार सोहळा कौतुकास्पद आहे.




# स्वराज्याची जननी आणि राष्ट्रनिर्मितीच्या आद्य शिक्षिका



## राजमाता जिजाऊ जयंती विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे कार्य प्रत्यक्ष रणांगणावर न दिसता इतिहासाची दिशा ठरवणारे ठरते. राजमाता जिजाऊ हे असेच एक तेजस्वी, दूरदृष्टीचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होय. छत्रपती शिवाजी महाराजांसारखा महान योद्धा, कुशल प्रशासक आणि लोककल्याणकारी राजा घडविण्यामागे राजमाता जिजाऊंचे संस्कार, विचार आणि धैर्य यांचा सिंहाचा वाटा होता.

**राजमाता जिजाऊ : काळाच्या पुढचा विचार**

इ.स. १५९८ मध्ये जन्मलेल्या जिजाऊंनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले आयुष्य व्यतीत केले. बालपणापासूनच राजकारण, युद्धनीती, धर्मनीती आणि समाजकारण यांचे सखोल भान त्यांना होते. निजामशाही, आदिलशाही आणि मुघल सत्तांच्या संघर्षाच्या काळात त्यांनी केवळ राजघराण्याची जबाबदारी सांभाळली नाही, तर भविष्यातील स्वराज्याचे स्वप्नही जोपासले.

**शिवरायांच्या घडणीत जिजाऊंची भूमिका**

राजमाता जिजाऊ या केवळ शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर त्या त्यांच्या पहिल्या गुरू, मार्गदर्शक आणि प्रेरणास्त्रोत होत्या. रामायण, महाभारत, पुराणे, संतवाङ्मय यातून त्यांनी शिवरायांच्या मनात धर्म, न्याय, स्वराज्य आणि लोककल्याणाची बीजे रोवली. त्यांनी शिवरायांना केवळ शस्त्रविद्या नव्हे, तर नैतिक बळ, प्रजाहितदक्षता आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य दिले.

**स्वराज्य संकल्पनेची जननी**

स्वराज्य ही केवळ सत्ता नव्हती, तर ती सामान्य जनतेच्या सन्मानाची, सुरक्षिततेची आणि न्यायाची हमी होती  हा विचार जिजाऊंनी शिवरायांच्या मनात रुजवला. स्त्री-सन्मान, धर्मस्वातंत्र्य, शेतकरी व प्रजेसाठी न्याय्य शासन या मूल्यांची शिकवण त्यांनी दिली. त्यामुळेच शिवाजी महाराजांचे राज्य हे लोकाभिमुख आणि मूल्याधिष्ठित ठरले.

**स्त्रीशक्तीचे आदर्श रूप**

राजमाता जिजाऊ या मध्ययुगीन काळातील असूनही आधुनिक विचारांच्या होत्या. त्या स्त्री-सामर्थ्याचे मूर्तिमंत प्रतीक होत्या. राजकीय निर्णय, किल्ल्यांचे व्यवस्थापन, संकटसमयी धैर्याने उभे राहणे  या सर्व बाबतींत त्यांनी नेतृत्व दाखवले. आजच्या काळात स्त्री-सक्षमीकरणाच्या चर्चा होत असताना जिजाऊंचे जीवन हे एक जिवंत आदर्श उदाहरण आहे.

**आजच्या समाजासाठी संदेश**

आजच्या अस्थिर, मूल्यसंघर्षाच्या काळात राजमाता जिजाऊंचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात. त्यांनी दिलेले संस्कार, राष्ट्रप्रेम, कर्तव्यभावना आणि नैतिकतेची शिकवण आजच्या पिढीने आत्मसात करण्याची गरज आहे. केवळ इतिहास म्हणून नव्हे, तर जीवनदर्शन म्हणून जिजाऊंकडे पाहिले पाहिजे. राजमाता जिजाऊ जयंती हा केवळ स्मरणाचा दिवस नसून स्वतःकडे पाहण्याचा, संस्कारांची उजळणी करण्याचा आणि समाजघडणीचा संकल्प करण्याचा दिवस आहे. स्वराज्याचा पाया घडविणाऱ्या या थोर मातेला वंदन करताना प्रत्येकाने आपल्या कर्तव्याची जाणीव करून घेणे हीच खरी जयंती साजरी करण्याची पद्धत ठरेल. स्वराज्य घडविणारी माता हीच राजमाता जिजाऊंची खरी ओळख आहे.



# जळवात म्हणजे काय ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तळपायाला भेगा पडणे या त्रासाला ‘ जळवात ’ असे म्हणतात. जळवात ही तळव्याची एक सामान्य समस्या आहे. याचा त्रास अनेकांना होत असतो. जळवात आजाराला इंग्रजीमध्ये क्रॅक हिल्स या नावाने ओळखले जाते. येथे जळवात का होतो व जळवातवरील उपायांची माहिती खाली दिली आहे.

**जळवात होण्याची कारणे**

जळवात होण्यास अनेक कारणे जबाबदार असतात. यामध्ये-अनवाणी चालण्याच्या सवयीमुळे. अधिक वेळ उभे राहण्याच्या सवयीमुळे. आरामदायी चपला, सँडल किंवा बूट न वापरण्यामुळे. हिवाळ्याच्या दिवसामध्ये थंड वातावरणामुळे पायाची त्वचा कोरडी झाल्यामुळे. जास्त गरम पाण्याने आंघोळ करण्याच्या सवयीमुळे. पुरेसे पाणी न पिण्याच्या सवयीमुळे. व्हिटॅमिन्सच्या कमतरतेमुळे. डायबेटीस, हायपो-थायरॉईडीजम, लठ्ठपणा, सोरायसिस, त्वचेचे विकार यासारखे त्रास असल्यासही जळवात होऊन तळपायाला भेगा पडण्याची समस्या होत असते.

**जळवाताची लक्षणे**

जळवातमध्ये तळपायाला भेगा पडतात. त्या ठिकाणची त्वचा फाटते. त्वचा रुक्ष व खडबडीत होते. काही जणांना जळवातमुळे तळपायाला भेगा पडून त्या ठिकाणी जखमा, वेदना व रक्तस्राव होणे असे त्रासही होत असतात.

**जळवातवर हे करा घरगुती उपाय**

१) मध : जळवातमध्ये पायाच्या भेगा भरून काढण्यासाठी मधातील अँटी-मायक्रोबियल व अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म खूप उपयुक्त ठरतात. तसेच त्वचा मॉइश्चराइज होण्यासाठीही मध उपयुक्त ठरते. यासाठी रोज रात्री झोपण्यापूर्वी पाय स्वच्छ धुवून त्याठिकाणी मध लावावे. यामुळे पायाच्या भेगा व जखमा दूर होण्यास मदत होते.

२) खोबरेल तेल : खोबरेल तेलातील विशेष गुणधर्मामुळे त्वचा मॉइश्चराइज होत असते. त्यामुळे जळवातामुळे पायाला भेगा पडल्यास तेथे खोबरेल तेल लावावे. यामुळे भेगा भरून येण्यास व भेगा पडलेली डेड स्किन निघून जाण्यास, त्वचा मऊ मुलायम होण्यास मदत होते.

३) कडुनिंबाचा रस : जळवातमध्ये पायाला भेगा पडल्यास कडुनिंबाची पाने बारीक वाटून त्याचा रस काढून लावल्यास भेगा लवकर कमी होतात.

## स्वामी विवेकानंद जयंती विशेष

# विचारांची मशाल आणि युवकांचे राष्ट्रकर्तव्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात १२ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका महान संन्याशाची जयंती नसून, तो भारतीय युवकांच्या आत्मबोधाचा, कर्तव्याची जाणीव करून देणारा आणि राष्ट्रनिर्मितीचा विचार जागवणारा दिवस आहे. स्वामी विवेकानंदांनी युवकांना केंद्रस्थानी ठेवून मांडलेले विचार आजही तितकेच समर्पक, प्रभावी आणि दिशादर्शक आहेत.

विवेकानंदांचे युवकविषयक तत्त्वज्ञान स्वामी विवेकानंदांच्या मते युवक म्हणजे शक्तीचा, साहसाचा आणि चारित्र्याचा मूर्तिमंत आविष्कार. त्यांनी नेहमीच शारीरिक, मानसिक आणि नैतिक बळावर भर दिला.

‘मला काही मूठभर सशक्त युवक द्या, मी भारत घडवीन’ हे त्यांचे विधान युवकांच्या सामर्थ्यावरचा त्यांचा दृढविश्वास दर्शवते. त्यांनी युवकांना केवळ आध्यात्मिकतेपुरते मर्यादित न ठेवता कर्मयोग, समाजसेवा आणि राष्ट्रसेवा यांची जोड देण्याचा संदेश दिला. त्यांच्या मते खरे शिक्षण तेच जे मनुष्याला स्वावलंबी, निर्भय आणि सेवाभावी बनवते.

**शिक्षण आणि युवक :** विवेकानंदांचा दृष्टिकोन

आजच्या शिक्षणपद्धतीवर स्वामी विवेकानंदांनी केलेली टीका आजही तितकीच लागू होते. त्यांनी पुस्तकप्रधान, परीक्षाकेंद्री शिक्षणाऐवजी चारित्र्यनिर्मितीवर आधारित शिक्षण आवश्यक असल्याचे सांगितले. आज शिक्षण असूनही युवक दिशाहीन वाटतो. कारण शिक्षणातून आत्मविश्वास, नैतिकता आणि समाजभान विकसित होत नाही. हा विरोधाभास विवेकानंदांच्या विचारांतून स्पष्टपणे दिसतो.



आजचा युवक आणि आधुनिक आव्हाने

एकविसाव्या शतकातील युवक तंत्रज्ञानसंपन्न, माहितीने परिपूर्ण आणि जागतिक स्तरावर स्पर्धेत आहे. मात्र त्याचवेळी तो मानसिक तणाव, असुरक्षितता, नैराश्य, बेरोजगारी आणि मूल्यसंघर्ष यांचा सामना करत आहे. स्वामी विवेकानंदांचे निर्भयता, आत्मविश्वास आणि स्वतःवर विश्वास हे विचार आजच्या युवकांसाठी औषधासारखे आहेत.

अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय

विवेकानंद हे अंधश्रद्धेचे पुरस्कर्ते नव्हते. त्यांनी विज्ञान, तर्क आणि अध्यात्म यांचा सुंदर समन्वय साधला. त्यांनी सांगितलेले अध्यात्म हे पलायनवादी नसून सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. आज जेव्हा युवक सोशल मीडियावर व्यक्त होतो तेव्हा विवेकानंदांचे विवेक, संयम आणि सत्याधिष्ठित विचार अधिक महत्त्वाचे ठरतात.\

राष्ट्रनिर्मिती आणि युवकांची जबाबदारी स्वामी विवेकानंदांनी राष्ट्र उभारणीसाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे स्पष्टपणे सांगितले. जात, धर्म, भाषा यापलीकडे जाऊन मानवसेवा हीच ईश्वरसेवा मानण्याचा विचार त्यांनी दिला. आजच्या सामाजिक विषमतेच्या, असहिष्णुतेच्या काळात विवेकानंदांचा मानवतावाद अधिकच आवश्यक आहे.

स्वामी विवेकानंद जयंती म्हणजे केवळ औपचारिक कार्यक्रम, भाषणे किंवा घोषणांचा दिवस नव्हे; तर तो स्वतःकडे पाहण्याचा, आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा संकल्प करण्याचा दिवस आहे. युवकांनी विवेकानंदांचे विचार पुस्तकांत न ठेवता जीवनात उतरवले, तरच खऱ्या अर्थाने युवा दिन साजरा होईल. आजच्या युवकाला केवळ यशस्वी करिअर नव्हे, तर सार्थ जीवन हवे आहे. त्या जीवनाचा मार्ग स्वामी विवेकानंदांच्या विचारांतूनच स्पष्टपणे दिसतो.

## कधी फक्त राजांचे अन्न असलेली
# ‘नान रोटी’ सामान्यांच्या ताटात कशी आली?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज नान हे जेवणाच्या टेबलांवर, रेस्टॉरंट मेनूमध्ये आणि अगदी जागतिक फ्यूजन पाककृतींमध्येही एक सामान्य पदार्थ आहे. पण शतकांपूर्वी ही मऊ, मऊ नान राजघराण्याचे प्रतीक होती.

स्वयंपाकघर ती फक्त राजे, श्रेष्ठी आणि सम्राटांसाठी तयार केली जात असे. राजवाड्यांच्या स्वयंपाकघरांपासून रस्त्याच्या कडेला असलेल्या भोजनालयांपर्यंत आणि आंतरराष्ट्रीय रेस्टॉरंट्सपर्यंत ही कशी पोहोचली?

इतिहास नानचा सर्वांत जुना लिखित इतिहास सुमारे १३०० इसवी सनाचा आहे. इंडो-पर्शियन कवी अमीर खुसरो यांनी लिहिले की, नानचे दोन प्रकार होते: नान-ए-तनुक आणि नान-ए-तंदूरी.

मुहम्मद बिन तुघलक अलाउद्दीन खिलजी आणि मुहम्मद बिन तुघलक यांच्या काळातील दरबारी जीवनाचे वर्णन करणारे इंडो-पर्शियन कवी अमीर खुसरो यांनी नानचा उल्लेख दरबारात वाढल्या जाणाऱ्या लक्झरी ब्रेड म्हणून केला.

**नान-ए-तंदूरी**

नान-ए-तनुक ही पातळ आणि नाजूक ब्रेड होती. तर नान-ए-तंदूरी जाड आणि मऊ होती. ओव्हनमध्ये बेक केली जात असे. त्यावेळी नान पीठ आणि यीस्टपासून बनविले जात असे. महागडे घटक जे दुर्मिळ आणि महागडे घटक होते. मुघल साम्राज्याच्या काळात नानची खऱ्या अर्थाने भरभराट झाली. मुघल सम्राटांनी नानला एका कलाप्रकारात रूपांतरित केले.

प्रमुख पदार्थ ते कबाब, किसलेले मांस आणि समृद्ध मांसाच्या ग्रेव्हीसह दिले जात असे. अकबराच्या कारकिर्दीतील ऐतिहासिक नोंदी जरी की ऐन-ए-अकबरी, नानला शाही स्वयंपाकघरात एक प्रमुख पदार्थ म्हणून उल्लेख करतात.

**महत्त्वाचा टप्पा**

शाही स्वयंपाकींनी किण्वन आणि पिकवण्याच्या तंत्रांची काळजीपूर्वक देखभाल केली आणि त्यांचे बारकाईने पालन केले. नानच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा तंदूरच्या वापराने आला.

**मातीचे ओव्हन**

हे मातीचे ओव्हन होते जे अत्यंत उच्च उष्णता निर्माण करण्यास सक्षम होते. तंदूरने नानला त्याचा विशिष्ट धुरकट सुगंध, फोडांचा पृष्ठभाग आणि मऊ आतील भाग दिला.


**नान राजेशाही**

तंदूर हळूहळू राजवाड्यांपासून शहरांमध्ये पसरत असताना नान राजेशाही सीमांच्या पलीकडे विस्तारू लागला. 18 व्या आणि 19 व्या शतकापर्यंत, ढाब्यात आणि स्थानिक भोजनालयांमध्ये नान दिसू लागले. १९४७ च्या फाळणीनंतर पंजाब आणि आसपासच्या भागातील स्थलांतरितांनी तंदूर बनविण्याची कला संपूर्ण भारतात पसरवली. तेथून नान सर्वत्र उपलब्ध होऊ लागले.

## प्रेरणादायक

# दहावी पास, गावातील लग्नात गायचा गाणी

## एक अब्ज ७२ कोटींच्या संपत्तीचा मालक आहे हा गायक



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

*गावातील लग्नात गाणी गाणारा हा गायक आज आहे कोट्यवधींचा मालक. प्रायव्हेट जेटसह भारत आणि विदेशात आहे अलिशान घर. बॉलिवूड इंडस्ट्रीमध्ये असे काही गायक आहेत, की ज्यांची गाणी प्रेक्षक प्रचंड आवडीने ऐकतात. त्याचबरोबर काही प्रेक्षक हे पंजाबी गाण्याचे देखील चाहते आहेत. आज आम्ही तुम्हाला अशाच एका पंजाबी इंडस्ट्रीमधील सर्वांत श्रीमंत गायकाबद्दल सांगणार आहोत.*

*पंजाबी संगीतसृष्टीतील सर्वांत श्रीमंत आणि लोकप्रिय गायक म्हणून दिलजीत दोसांझचे नाव आघाडीवर घेतले जाते. दिलजीत केवळ पंजाबी इंडस्ट्रीपुरता मर्यादित नाही, तर त्याने आपल्या गाण्यांच्या जोरावर देश-विदेशात देखील मोठी लोकप्रियता मिळविली आहे. त्याच्या गाण्यांचा जादूई प्रभाव असा असतो, की तो जेव्हा स्टेजवर येतो तेव्हा काही मिनिटांतच संपूर्ण वातावरण उत्साहाने भरून जाते. त्याच्या दमदार आवाजावर आणि दमदार परफॉर्मन्सवर प्रेक्षक अक्षरशः थिरकताना दिसतात.*

*दिलजीत दोसांझ हा पंजाबी इंडस्ट्रीमधील सर्वांत महागडा आणि प्रसिद्ध गायकांपैकी एक मानला जातो. त्याने २००२ मध्ये त्याचा पहिला म्युझिक अल्बम रिलीज करून संगीत कारकिर्दीची सुरूवात केली. त्यानंतर त्याने एकापेक्षा एक सुपरहीट गाणी दिली. आज त्याची गाणी केवळ पंजाबमध्येच नाही तर संपूर्ण भारतात आणि परदेशातही तितकीच लोकप्रिय आहेत.*

***दिलजीत दोसांझची संपत्ती***

*गायनासोबतच दिलजीत दोसांझने अभिनय क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याने अनेक पंजाबी तसेच हिंदी चित्रपटांमध्ये काम केले असून त्याच्या अभिनयाचेही मोठ्या प्रमाणात कौतुक झाले आहे. मेहनत आणि सातत्यच्या जोरावर त्याने इंडस्ट्रीमध्ये स्वतःचे मजबूत स्थान निर्माण केले आहे.*

*दिलजीत दोसांझच्या एकूण संपत्तीबद्दल बोलायचे झाले तर आकडे ऐकून कुणालाही आश्चर्य वाटू शकते. टाइम्स ऑफ इंडियाच्या रिपोर्टनुसार दिलजीत दोसांझची एकूण संपत्ती सुमारे १७२ कोटी रुपये इतकी आहे. इतकेच नाही तर दिलजीत दोसांझकडे अनेक महागड्या गाड्या आहेत. तसेच भारतासोबतच अमेरिकेत देखील एक आलिशान डुप्लेक्स घर आहे.*

***साध्या कुटुंबातून यशाच्या शिखरापर्यंत***

*दिलजीत दोसांझचा जन्म पंजाबमधील एका छोट्या गावात झाला. तो एका साध्या कुटुंबातून आला असून आपल्या कष्ट आणि मेहनतीच्या जोरावर त्याने आज हे यश मिळविले आहे. एकूणच दिलजीत दोसांझची संपत्ती आणि त्याची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात असून त्याच्या गाण्यांवर आजही कोट्यवधी चाहते थिरकताना आणि प्रेम करताना दिसतात. पंजाबी इंडस्ट्रीमध्ये त्याचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते.*

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# जेमिमाला दिलेले प्रॉमिस सुनील गावस्करांनी पाळले

## विश्वविजेती जेमिमाला दिले खास गिफ्ट आणि रंगली मैफल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताने वर्ल्डकप जिंकला तर मी गाणे म्हणेल आणि जेमिमा गिटारवर मला साथ देईल, असे सुनील गावस्कर म्हणाले होते. हे प्रॉमिस त्यांनी पाळले असून, जेमिमाला खास गिफ्ट देऊन मैफलही चांगलीच रंगली.

भारतीय महिला संघाने २ नोव्हेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेला नमवत पहिल्यावहिल्या वर्ल्डकप जेतेपदावर नाव कोरले. विजयानंतर जेमिमा मुलाखती, बिग बॅश लीग, श्रीलंका दौरा, बँडिगचे कार्यक्रम, सत्कार यात व्यस्त होती. त्यानंतर गावस्कर आणि जेमिमाची भेट झाली. गावस्कर यांनी जेमिमाची भेट घेतली. तिला बॅटच्या आकाराची गिटार भेट दिली. तुम्ही तिचे अनावरण करा असे जेमिमा म्हणाली. मात्र, 'मी सलामीचा फलंदाज नाही, तू आहेस' अशी गंमत करत गावस्करांनी जेमिमाला बॅटच्या आकाराची गिटार भेट दिली. जेमिमा या गिफ्टने प्रचंड खूश झाली. जेमिमाने या बॅटरुपी गिटारसह छानशी पोझही दिली.

'ये दोस्ती हम नही तोंडेंगे, तोडेंगे दम मगर..' या शोलेतल्या जय- वीरुवर चित्रित झालेल्या खास गाण्यावर गावस्कर- जेमिमा यांची मैफल रंगली. गावस्कर गाणे म्हणत होते तर जेमिमा बॅटरुपी गिटार वाजवत होती. मैफलीनंतर गावस्कर आणि जेमिमाने बॅटरुपी गिटारसह फोटोशूटही केले. चाहत्यांनी या पोस्टला भरभरून प्रतिसाद दिला आहे.

**क्या हुआ तेरा वादा..**

ही तर नुसतीच झलक आहे. गिटारवर अख्खे गाणे लवकरच घेऊन येऊ असे जेमिमाने म्हटले आहे. वर्ल्डकप जिंकल्यानंतर जेमिमाने गावसकर यांना अगदी संगीतपूर्ण पद्धतीने त्यांचे वचन पूर्ण करण्याची आठवण करून दिली. तसेच महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर जेमिमाने इन्स्टाग्रामवर एक मजेशीर व्हिडिओ शेअर करत लिहिले होते, की तुमच्याबरोबर गाणे गाण्यासाठी वाट पाहत आहे. जेमिमा म्हणाली होती, 'हॅलो सुनील गावस्कर सर, तुम्ही म्हटले होतं की भारतीय संघाने जर विश्वचषक जिंकला तर आपण दोघे एकत्र गाणे गाऊ. मी गिटार घेऊन रेडी आणि तुम्हीही माईक घेऊन तयार असाल. खूप सारे प्रेम आणि खूप खूप आभार.' जेमिमाने या व्हीडिओच्या पुढे सुनील गावस्करांनी मुलाखतीत म्हटलेल्या वक्तव्याचा व्हीडिओ शेअर केला आहे. त्यापुढे बीसीसीआयच्या एका कार्यक्रमात गाणे गातानाचा व्हीडिओही जेमिमाने शेअर केला आहे. यामध्ये दोघांनी 'क्या हुआ तेरा वादा' हे गाणे गायले होतं.




### नोकरी असावी तर अशी!

# कर्मचाऱ्यांना बोनस म्हणून कार आणि फ्लॅट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

## दिलदार मालक नक्की कोण?





एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलाने केवळ १८० रुपयांच्या पगारापासून सुरुवात करून १६ हजार कोटींचे हिरे साम्राज्य उभे केले. कर्मचाऱ्यांना बोनस म्हणून कार आणि फ्लॅट दिले जातात. तर जाणून घेऊयात कोण आहे, हा दिलदार मालक ? गुजरातच्या भूमीने देशाला अंबानी आणि अदानीं यांच्यासारखे दिग्गज उद्योगपती दिले. मात्र, याच मातीत असा एक हिरा चमकला ज्याची यशोगाथा कोणत्याही चित्रपटाला मागे टाकेल. ते नाव म्हणजे सावजी ढोलकिया.

सावजी ढोलकिया हे आज १६ हजार कोटी रुपयांच्या साम्राज्याचे मालक आहेत. ढोलकिया यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात अवघ्या १८० रुपये दर महिन्याच्या पगारावर केली होती. सावजी ढोलकिया यांचा जन्म एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. घरच्या बेताच्या परिस्थितीमुळे त्यांना केवळ पाचवीपर्यंतच शिक्षण घेता आले. वयाच्या १३व्या वर्षी त्यांनी शाळा सोडली. १९७७ मध्ये रोजगाराच्या शोधात ते सुरतला आले. जेव्हा ते पहिल्यांदा सुरतमध्ये आले, तेव्हा त्यांच्या खिशात फक्त १२ रुपये होते, असे म्हटले जाते. सुरतमध्ये त्यांनी एका हिऱ्याच्या कारखान्यात काम करण्यास सुरुवात केली. त्यांचा पहिला पगार फक्त १७९ रुपये इतका होता. मात्रख, त्यांची जिद्द इतकी मोठी होती, की त्या अल्प पगारातूनही ते दरमहा ३९ रुपयांची बचत करायचे. हिरे घासण्याचे कौशल्य आत्मसात केल्यानंतर त्यांनी या व्यवसायात उतरण्याचा धाडसी निर्णय घेतला. १९८४ मध्ये सावजी ढोलकिया यांनी आपले भाऊ हिम्मत आणि तुलसी ढोलकिया यांच्यासोबत मिळून व्यवसायाचा पाया रचला. १९९२ मध्ये त्यांनी हरी कृष्णा एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी अधिकृतपणे स्थापन केली. आज ही कंपनी जगातील ७९ देशांमध्ये पॉलिश केलेले हिरे निर्यात करते. १६ हजार कोटींची उलाढाल असलेली ही कंपनी हिरे उद्योगातील एक जागतिक नाव असलेली कंपनी बनली आहे. सावजी ढोलकिया केवळ त्यांच्या संपत्तीसाठीच नाही, तर त्यांच्या उदारतेसाठी जगभर ओळखले जातात. दिवाळी बोनस म्हणून आपल्या कर्मचाऱ्यांना कार, घरे आणि मुदत ठेवी भेट देण्याची त्यांची परंपरा आहे. कर्मचाऱ्यांप्रती असलेल्या या संवेदनशीलतेमुळेच त्यांना एक आदर्श उद्योजक मानले जाते.

# अ‍ॅड. ललिता पाटील स्कूलला 'गोल्डन स्कूल अवॉर्ड' जाहीर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : येथील अ‍ॅड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूलला इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड संस्थेमार्फत यावर्षीचा प्रतिष्ठित 'गोल्डन स्कूल अवॉर्ड' जाहीर झाला आहे. शाळेच्या प्रगतीपथात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.


शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, डिजिटल शिक्षण, प्रभावी शाळा व्यवस्थापन आणि नावीन्यपूर्ण शालेय उपक्रम, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवलेली गुणवत्ता या सर्व गुणवत्तेच्या निकषावर हा अवॉर्ड प्रदान करण्यात येतो. शाळेत आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अध्यापन, मूल्याधिष्ठित शिक्षण, क्रीडा, कला- संस्कृती, जीवनकौशल्य विकास यासोबतच पालकशाळा समन्वय यावर खास भर दिला जात असल्याने परीक्षक मंडळाने दखल घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या घडणीसाठी शिक्षकांचा उत्साह, शिस्तबद्ध वातावरण, तसेच स्वच्छ व सुरक्षित कॅम्पस ही शाळेची वैशिष्ट्ये आहेत. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा अ‍ॅड. ललिता पाटील यांनी प्राचार्यांसह शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि व्यवस्थापन मंडळाचे अभिनंदन केले आहे. प्राचार्य डॉ. नीरज चव्हाण यांनी हा पुरस्कार अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा असल्याची भावना व्यक्त केली. येत्या काळात अधिक नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील संधी उपलब्ध करून देण्याचा निर्धार शाळेकडून व्यक्त करण्यात आला आहे. अमळनेर तालुक्यातील हा अवॉर्ड मिळवणारी ही एकमेव शाळा आहे.

बोर्डाच्या गुणवता यादीत जिल्ह्यातून तिसरे स्थान, ऑलिम्पियाड परिक्षेत राज्यस्तरीय पाचवे तर राष्ट्रीय स्थान, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कराटे व आर्ट स्तरावर गुणवत्ता यादीत विद्यार्थ्यांची झालेली निवड ही ह्या शाळेच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकास चे उत्कृष्ट नियोजन दाखवत असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले असून शाळेचा सार्थ अभिमान असल्याचे म्हटले आहे. सर्व स्तरातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'येथे' घडतात गुप्तहेर

## खास विद्यापीठात दिले जाते जासूस होण्याचे प्रशिक्षण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



इतिहासात अनेक महत्त्वाचे आणि प्रसिद्ध गुप्तहेर होऊन गेले. आजच्या काळातही जगातील प्रत्येक देशात गुप्तहेर असतात. जे संबंधित देशाची माहिती आपल्या देशाच्या सरकारला देत असतात. जगाच्या इतिहासात गुप्तहेरांची भूमिका नेहमीच महत्वाची राहिलेली आहे. इतिहासात अनेक महत्त्वाचे आणि प्रसिद्ध गुप्तहेर होऊन गेले. आजच्या काळातही जगातील प्रत्येक देशात गुप्तहेर असतात. जे संबंधित देशाची माहिती आपल्या देशाच्या सरकारला देत असतात.

मात्र, फ्रान्समध्ये एक असे विद्यापीठ आहे जिथे गुप्तहेरांना प्रशिक्षण दिले जाते. या विद्यापीठातील प्राध्यापकांना त्यांच्याकडे शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची खरी नावेही माहीत नसतात. कारण या विद्यापीठात शिकणारे अनेक विद्यार्थी हे फ्रान्सच्या गुप्तचर संस्थांशी संबंधित आहेत.

'हेरगिरी' शिकवली जाते

एका वृत्तानुसार पॅरिसच्या बाहेर स्थित 'Sciences Po Saint-Germain' विद्यापीठाचे कॅम्पस आहे. २०व्या शतकातील ही इमारत आणि तिचे जड लोखंडी दरवाजे एखाद्या हेरगिरीच्या चित्रपटासारखे आहे. या विद्यापीठात एक विशेष डिप्लोमा आहे. ज्याचे नाव 'Diplme sur le Renseignement et les Menaces Globales' (इंटेलिजन्स आणि जागतिक धोक्यांवरील डिप्लोमा) असे आहे. हा कोर्स केवळ सामान्य विद्यार्थीच नव्हे तर फ्रान्सच्या गुप्तचर संस्थांचे अधिकारीही करतात. २०२५ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर कोर्सला सुरूवात हेरगिरीचा हा कोर्स सुमारे १० वर्षांपूर्वी फ्रान्स सरकारच्या सूचनेनुसार सुरू करण्यात आला होता. १०१५ मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या मोठ्या दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने गुप्तचर संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर भरती सुरू केली. नवीन आणि जुन्या गुप्तहेरांना सतत प्रशिक्षण मिळत राहावे, यासाठी हा कोर्स सुरु करण्यात आलेला आहे.

काय शिकवले जाते?

या चार महिन्यांच्या कोर्समध्ये १२० तासांचा अभ्यास आहे. याची फी सुमारे ५ हजार युरो आहे. येथे संघटित गुन्हेगारी, इस्लामी कट्टरवाद, राजकीय हिंसाचार, बिझनेस इंटेलिजन्स, सायबर आणि आर्थिक युद्ध याबाबत शिक्षण दिले जाते. या वर्षाच्या बॅचमध्ये २८ विद्यार्थी आहेत, ज्यांपैकी ६ सक्रिय गुप्तहेर आहेत. तसेच या बॅचमध्ये निम्म्या विद्यार्थिनी आहेत. या कोर्ससाठी प्रत्येकाला प्रवेश मिळत नाही. यासाठी फ्रान्सचा नागरिक असणे अनिवार्य आहे. परदेशी लोकांचे अर्ज फेटाळले जातात. दरम्यान, हा कोर्स केल्यानंतर हे गुप्तहेर परदेशात जाऊन देशासाठी महत्वाची माहिती गोळा करतात आणि सरकारला देतात. यामुळे एखादे ऑपरेशन राबविणे सोपे होते.


## चांदीला स्वस्त पर्याय

# जर्मन कारागिरांनी तयार केला सेम टू सेम धातू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जर्मन सिल्वर दिसायला चांदीसारखी असली तरी त्यात खरी चांदी नसते. ही तांबे, जस्त आणि निकेलपासून बनलेला स्वस्त मिश्रधातू आहे. खऱ्या चांदीत ९२. ५ टक्के शुद्ध चांदी असून ती महाग आणि मौल्यवान असते. जर्मन कारागिरांनीही सेम टू सेम धातू तयार केला असून, तो खूप लोकप्रिय होत आहे.

भारतात चांदी नेहमीच शुभ, पवित्र आणि मौल्यवान मानली जाते. पारंपारिक विधी, लग्न, दागिने, भांडी आणि सजावटीमध्ये चांदीचे विशेष महत्त्व आहे. मात्र, सध्या चांदीची किंमत इतकी वाढली आहे, की प्रत्येकासाठी ती परवडणे कठीण झाले आहे. परिणामी, लोक चांदीसारख्या स्वस्त धातूंकडे वळत आहेत. असाच एक धातू जर्मन सिल्वर आहे, जो आजकाल खूप लोकप्रिय होत आहे. तो अगदी चांदीसारखा दिसतो. मात्र, परंतु प्रत्यक्षात, दोन्ही भिन्न आहेत. जर्मन सिल्वरमध्ये खरी चांदी अजिबात नसते. ही सुमारे ६० टक्के तांबे, २० टक्के जस्त आणि २० टक्के निकेलपासून बनलेली मिश्रधातू आहे. चांदीसारखा पांढरा आणि चमकदार रंग यामुळे अनेकदा लोक हीच खरी चांदी समजतात. १९व्या शतकात, जर्मन कारागिरांनी चांदीला स्वस्त पर्याय म्हणून ते तयार केले. ज्यामुळे त्याला जर्मन सिल्वर असे नाव मिळाले.



खऱ्या चांदीला सामान्यतः स्टर्लिंग सिल्व्हर असे म्हणतात. त्यात ९२. ५ टक्के शुद्ध चांदी असते. उर्वरित ७. ५ टक्के तांबे किंवा इतर धातू असतात. त्यावर अनेकदा ९२५ असे चिन्हांकित केले जाते. खऱ्या चांदीला खूप चमकदार, मऊ, ऍलर्जी नसलेली आणि मौल्यवान धातू मानले जाते. म्हणूनच ती महाग आहे.

आजकाल चांदीची किंमत सतत वाढत आहे. लग्न, सण आणि भेटवस्तूंचा खर्च आधीच जास्त आहे. म्हणून, लोकांना कमी किमतीत चांदीचा लूक हवा आहे. येथेच जर्मन सिल्वर एक आशादायक पर्याय म्हणून उदयास येते. कारण ती चांदीसारखी दिसते, खूप कमी खर्चाची असते, मजबूत असते आणि दैनंदिन वापरासाठी योग्य असते. म्हणूनच, आजकाल दागिने, पूजा वस्तू, भांडी आणि सजावटीच्या वस्तूंमध्ये जर्मन सिल्वर मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

फरक ओळखण्याची सोपी पद्धत

काही सोप्या पद्धतींचा अवलंब करून तुम्ही घरी खऱ्या चांदीमध्ये आणि जर्मन सिल्वरमधील फरक ओळखू शकता. उदाहरणार्थ, हॉलमार्क तपासा. अस्सल चांदीला ९२५, ९९९ किंवा स्टर्लिंग असे चिन्हांकित केले आहे. जर्मन सिल्वरला EPNS, NS, Alpaca, GS किंवा इतर काहीही चिन्हांकित केले आहे.

खरी चांदी चुंबकाला चिकटत नाही. जर्मन सिल्वरवर थोडासा चुंबकीय प्रभाव असू शकतो. अस्सल चांदी त्याच्या आकारामुळे जड वाटते. जर्मन सिल्वर हलकी असते. पांढऱ्या कापडाने घासल्यास अस्सल चांदीवर काळे डाग राहू शकतात, परंतु जर्मन सिल्वरवर तसे होत नाही. जर्मन चांदी योग्य काळजी घेतल्यास वर्षानुवर्षे चांगली दिसते. मात्र, यासाठी जर्मन सिल्वरचे पाणी आणि रसायनांपासून संरक्षण करा, दागिन्यांना थेट परफ्यूम लावणे टाळा, वापरल्यानंतर ते कोरड्या कापडाने पुसून घ्या, ते कोरड्या जागी एका बॉक्समध्ये ठेवा आणि कधीकधी हलक्या पॉलिश केलेल्या कापडाने स्वच्छ करा.

भूतदया हीच खरी ईश्वर सेवा ॥
अमळनेरकर
नागरिकांना कळकळीचे
आवाहन



लख्ख ऊन... कोरडा घसा... आणि घामाच्या धारा!
पुढच्या काही दिवसांत उन्हाचा तडाखा वाढणार आहे. आपण माणसे 'पाणी-पाणी' करतो तेंव्हा त्या मुक्या पशू-पक्ष्यांचं काय? संत ज्ञानेश्वर आणि जगद्गुरू तुकोबारायांनी आपल्याला 'भूतदया' शिकवली. त्यास अनुसरून कडक उन्हात पाण्यासाठी व्याकुळ झालेल्या एका पाखराची तहान भागवणे, हीच मोठी मानवता आहे.
आपण काय करू शकतो?
१) गॅलरीत किंवा छतावर: पक्ष्यांसाठी एका मातीच्या भांड्यात स्वच्छ पाणी ठेवा.
२) दाराबाहेर: भटक्या कुत्र्यांसाठी किंवा जनावरांसाठी पाण्याच्या कुंडीची सोय करा.
३) शक्य असल्यास इतरांनाही मातीची भांडी किंवा पाण्याची पात्रे भेट देऊन प्रोत्साहित करा.
"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे..."
आपल्या एका छोट्या प्रयत्नाने एखाद्या जीवाचा प्राण वाचू शकतो!
चला, या उन्हाळ्यात माणुसकीचं 'पाणी' पाजूया!
विनीत
व्हॉइस ऑफ मीडिया
(Voice of Media) शाखा: अमळनेर
VOICE OF MEDIA
सर्व वृत्तपत्र वाचकांना कळकळीची प्रार्थना
कृपया उन, वारा, पाऊसाची तमा न बाळगता रोज सकाळी गावभर फिरफीर करून आपल्याला घरपोच वृत्तपत्र आणून देणाऱ्या वृत्तपत्र एजंटांना नियमित व वेळेवर पेपरचे बिल देवून सहकार्य करा...! थोड्याश्या बिलासाठी त्यांना पुन्हा-पुन्हा फिरफीर करायला लावू नका...!






# यहां हुआ था भगवान शिव और देवी पार्वती का विवाह...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तराखंड के रुद्रप्रयाग जिले में 'त्रियुगी नारायण' एक पवित्र जगह है। माना जाता है कि यहां भगवान शिव और देवी पार्वती का विवाह हुआ था। यहीं भगवान विष्णु और देवी लक्ष्मी का एक मंदिर है, जिसे शिव पार्वती के विवाह स्थल के रुप में जाना जाता है। मंदिर परिसर में ऐसी कई चीजें हैं, जिनका संबंध शिव-पार्वती के विवाह से माना जाता है।

मंदिर परिसर में अखंड धुनी है। मान्यता है कि भगवान शिव और माता पार्वती ने इसी कुंड के फेरे लिए थे। इस हवन कुंड में आज भी अग्नि प्रज्वलित रहती है। मंदिर में प्रसादस्वरूप लकड़ियां चढ़ाई जाती है। भक्त लोग इस पवित्र हवन कुंड की राख अपने घर लेकर जाते हैं।

यह वह स्थान है जहां भगवान शिव और माता पार्वती विवाह के समय बैठे थे। इसी स्थान पर बैठकर भगवान ब्रह्मा ने भोलेनाथ और देवी पार्वती का विवाह करवाया था।

भगवान शिव और देवी पार्वती का विवाह ब्रह्मा जी ने करवाया था। ब्रह्मा जी ने विवाह में शामिल हेने से पहले जिस कुंड में स्नान किया था, उसे ब्रह्मकुंड के नाम से जाना जाता है। यहां आने वाले भक्त इस कुंड में स्नान करके ब्रह्मा जी का आशीर्वाद प्राप्त करते हैं। जब भोलेनाथ का विवाह हुआ तो उन्हें एक गाय दान स्वरूप मिली थी। माना जाता है कि यहीं वह स्तंभ है, जहां गाय को बांधा गया था। भोलेनाथ और देवी पार्वती के विवाह में भगवान विष्णु ने माता पार्वती के भाई की भूमिका निभाई थी। जिस कुंड में स्नान करके भगवान विष्णु विवाह संस्कार में शामिल हुए थे, उसे विष्णु कुंड कहा जाता है। भोलेनाथ के विवाह में भाग लेने आए सभी देवी-देवताओं ने जिस कुंड में स्नान किया उसे रुद्र कुंड कहा जाता है। इन सभी कुंडों में जल का स्त्रोत सरस्वती कुंड को माना जाता है। रामचरितमानस में गोस्वामी तुलसीदास जी ने शिव

**विवाह के बारे में लिखा है...**

जसि बिबाह कै बिधि श्रुति गाई। महामुनिन्ह सो सब करवाई॥ गहि गिरीस कुस कन्या पानी। भवहि समरपीं जानि भवानी॥ वेदों में विवाह की जैसी रीति कही गई है, महामुनियों ने वह सभी रीति करवाई। पर्वतराज हिमाचल ने हाथ में कुश लेकर तथा कन्या का हाथ पकड़कर उन्हें भवानी (शिवपत्नी) जानकर शिवजी को समर्पण किया। पानिग्रहन जब कीन्ह महेसा। हियँ हरषे तब सकल सुरेसा॥ बेदमन्त्र मुनिबर उच्चरहीं। जय जय जय संकर सुर करहीं॥ जब महेश्वर (शिवजी)ने पार्वती का पाणिग्रहण किया, तब (इन्द्रादि) सब देवता हृदय में बड़े ही हर्षित हुए। श्रेष्ठ मुनिगण वेदमंत्रों का उच्चारण करने लगे और देवगण शिवजी का जय-जयकार करने लगे।

बाजहिं बाजन बिबिध बिधाना। सुमनबृष्टि नभ भै बिधि नाना॥ हर गिरिजा कर भयउ बिबाहू। सकल भुवन भरि रहा उछाहू॥ अनेकों प्रकार के बाजे बजने लगे। आकाश से नाना प्रकार के फूलों की वर्षा हुई। शिव-पार्वती का विवाह हो गया।।सारे ब्राह्माण्ड में आनंद भर गया...

# समुद्रमंथन आणि १४ रत्ने!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एक भारतीय पुराणकथा. देवांनी आणि दानवांनी अमृतप्राप्तीसाठी एकत्र येऊन हे समुद्रमंथन केल्यामुळे त्यास 'अमृतमंथन' असेही म्हणतात. ही कथा रामायण, महाभारत आणि पुराणे या ग्रंथांत भिन्न-भिन्न प्रकारे सांगितली आहे.

देवांचे राजे इंद्र यांच्यावर प्रसन्न होऊन दुर्वास मुनींनी त्यांना आपल्या गळ्यातील दिव्य फुलांची माला दिली. यावेळी हत्तीवर आरूढ झालेल्या राजे इंद्रांनी ती सुंदर माला हत्तीच्या माथ्यावर ठेवली. पण ती खाली पडून हत्तीच्या पायांखाली तुडविली गेल्यामुळे संतापलेल्या दुर्वास मुनींनी राजे इंद्रांना शाप दिला, की तुझे सामर्थ्य नाहीसे होईल आणि तुझे वैभवशाली राज्यही नाहीसे होईल.

या शापाच्या प्रभावामुळे शक्तिहीन झालेले देव दैत्यांबरोबरच्या लढाईत सतत निःष्प्रभ होऊ लागले. शिवाय दानवांचे गुरू शुक्राचार्य यांच्याकडे संजीवनी विद्या होती. त्यामुळे युद्धात मरणाऱ्या दानवांना ते पुन्हा जीवंत करीत. देवांकडे मात्र अशा प्रकारची विद्या नव्हती. अखेर ते भगवान विष्णूंना शरण गेले तेव्हा विष्णूंनी समुद्रमंथन करून अमृत मिळविण्याची योजना देवांना सांगितली. त्यासाठी तह करून दानवांचे सहाय्य घेण्याचा सल्लाही विष्णूंनी दिला. त्यानुसार देव-दानवांनी मंदार पर्वताची रवी व वासुकी सर्पाची दोरी करून समुद्रमंथन केले. भगवान विष्णूंनी कासवाच्या रूपाने मंदार पर्वताला सागराच्या तळाशी आधार दिला.

समुद्रमंथन प्रकिया चालू असताना पर्वतावरील वनस्पती व पशुपक्षी समुद्रात पडले. त्यापासून वारूणी (मदयसदृश पेय) उत्पन्न झाली. तिचे प्राशन केल्यामुळे देव- दैत्यांना उत्साह लाभला. मात्र वासुकीच्या मुखातून विषारी वायू बाहेर पडल्यामुळे दानव होरपळू लागले. भगवान विष्णूंनी त्या वायूचे मेघात रूपांतर केले व देवांवर पर्जन्यवृष्टी केली. समुद्रमंथनामुळे समुद्रातील सर्व प्राणी खवळल्याने उत्पन्न झालेल्या विषाने (हलाहल) देव-दैत्य होरपळू लागले. त्यांच्या विनंतीनुसार भगवान शंकरांनी प्रसन्न होऊन विषप्राशन केले. त्यामुळे ते नीलकंठ झाले.



या समुद्रमंथनातून चौदा रत्ने वर आली. त्यापैकी एक अमृत होते. मात्र अमृताचा कुंभ दिसताच तो दैत्यांनी पळविला. तथापि, विष्णूंनी एका सुंदर स्त्रीचे रूप घेऊन अमृताची योग्य वाटणी करण्याच्या उद्देशाने दैत्यांकडून तो कुंभ घेतला आणि तो देवांना दिला. त्यानंतर संतापलेल्या दैत्यांनी देवांशी युद्ध सुरू केले. पण त्यातही विष्णूकृपेने देव विजयी झाले.

**समुद्रमंथनातून प्राप्त १४ रत्ने**

समुद्रमंथनातून प्राप्त झालेल्या चौदा रत्नांचा निर्देश पुढील श्लोकात आढळतो. हा श्लोक हिंदू विवाहविधीत म्हटल्या जाणाऱ्या मंगलाष्टकात समाविष्ट आहे.

लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुराधन्वंतरिश्च द्रमाः । गावः कामदुधाः सुरेश्वरगजो रंभादिदेवाङ्गनाः ॥ अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शङ्खोऽमृतं चांबुधेः । रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्वन्तु वो मङ्गलम् ॥

(१) लक्ष्मी, (२) कौस्तुभ मणी, (३) पारिजातक वृक्ष, (४) सुरा, (५) धन्वंतरी (एक दिव्यपरुष. तो हातात अमृतकुंभ घेऊन वर आला), (६) चंद्र, (७) कामधेनू- गाय, (८) ऐरावत- हत्ती, (९) रंभा व इतर अप्सरा, (१०) उच्चेःश्रवा हा सात मुखे असलेला शुभ घोडा, (११) हलाहल- विष, (१२) शार्ङ्ग- धनुष्य, (१३) पांचजन्य शंख आणि (१४) अमृत ही या श्लोकात निर्देशिलेली चौदा रत्ने. या श्लोकाचा कर्ता अज्ञात आहे. समुद्रमंथनातून चौदा रत्ने वर आली असे सामान्यतः मानले जात असले, तरी रत्नांची संख्या व नावे निरनिराळ्या ग्रंथांत निरनिराळी दिल्याचे आढळते.

उदा.- रामायणात सहाच रत्नांचा (धन्वंतरी, अप्सरा, सुरा, उच्चे:श्रवा, कौस्तुभ व अमृत) निर्देश आहे, तर महाभारतात सात रत्नांचा (चंद्र, श्री, सुरा, उच्चे:श्रवा, कौस्तुभ, धन्वंतरी, अमृत) उल्लेख आढळतो.

## मानवी जन्माचे महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मानवी जन्म खूप कष्टाने मिळतो. रस्त्यावर फिरणारे भटके प्राणी देखील एकेकाळी मानव म्हणून जन्माला आले होते. त्यापैकी काही डॉक्टर होते. काही इंजिनिअर होते, अन्य कोणत्या ना कोणत्या पदावर होत. आणि त्यांचे गुरू त्यांना भगवंताची स्तुती करण्यासाठी सत्संग आणि भजन म्हणायला सांगत होते. मग ते हसून उत्तर द्यायचे, की असल्या गोष्टींसाठी आमच्याकडे वेळ नाही. मग त्यांनी त्यांचा मानवी जन्म गमावला. त्यांनी कधी भगवंताचे भजन गायिले नाही, सत्संग केला नाही, धर्मानुसार वागले नाही. आता ते प्राण्यांच्या योनीत जन्माला आले आहेत. बिचारे प्राणी रस्त्यावर निराधारपणे फिरतात. काही त्यांना फटकारतात. कर्म त्यांना खूप रडवते, ते कोणालाही सोडत नाही. जर आपल्याला आता समजले नाही, तर आपल्याला कधी समजेल ? भगवंताची भक्ती केल्याने भजन व सत्संग केल्याने वाईट कर्म धुवून जातात. अजून वेळ गेलेली नाही. कर्म खूप आहेत आणि वेळ कमी आहे. आपण आपल्या कुटुंबासमवेत भगवंताचे भजन व सत्संग केले पाहिजे आणि त्याचे आभार मानले पाहिजे.

# शिव सहस्रनाम स्तोत्रम् – अर्थासह मराठी भावार्थानुसार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**(४१) वामदेवश्च वामश्च प्राग्दक्षिणश्च वामनः।**
**सिद्धयोगी महर्षिश्च सिद्धार्थः सिद्धसाधकः॥**
**अर्थ :** वामदेव शिवाचे करुणामय रूप, वाम कोमल आणि स्नेहमय, प्राग्दक्षिण सर्व दिशांत व्यापलेले, वामन विनम्र व सौम्य स्वरूपाचे, सिद्धयोगी पूर्ण सिद्धीप्राप्त योगी, सिद्धसाधक साधनाद्वारे सिद्धी देणारे.
**भावार्थ :** शिवाचे वामदेव रूप प्रेम, करुणा व सौम्यता शिकवते. ते दिशांचा, काळाचा व भावनांचा संतुलन करतात. त्यांचा विनम्र वामन भाव सांगतो, की खरा बल नम्रतेत असतो. ते सिद्धयोगी आहेत, जे भक्ताच्या साधनेला पूर्णत्व देतात.

**(४२) भिक्षुश्च भिक्षुरूपश्च विपणो मृदुरव्ययः।**
**महासेनो विशाखश्च षष्टिभागो गवाम्पतिः॥**
**अर्थ :** भिक्षु दीनवत विनम्र, भिक्षुरूप संन्यासी रूप धारण करणारे, मृदू कोमल स्वभावाचे, महासेन कुमारस्वामीचे पिता, गवाम्पति गोपालक, विश्वाचे पालनकर्ते.
**भावार्थ :** शिव कधी भिक्षुकासारखे नम्र, तर कधी युद्धदेवतेचे जनक. त्यांचे भिक्षुरूप हे वैराग्याचे प्रतीक आहे. ते सर्वांचे पालक आहेत, म्हणूनच गवाम्पति सर्व सजीवांचे रक्षक.

**(४३) वज्रहस्तश्च विष्कम्भी चमूस्तम्भन एव च।**
**वृत्तावृत्तकरस्तालो मधुर्मधुकलोचनः॥**
**अर्थ :** वज्रहस्त शक्तिशाली हातधारी, चमूस्तम्भन सेनांचा नाश करणारा, मधुर कोमलवाणी, मधुकलोचन मधुर व तेजस्वी नेत्रधारी.
**भावार्थ :** शिवाची ताकद आणि कोमलता दोन्ही एकत्र आहेत. ते न्यायाच्या रक्षणासाठी उग्र, पण भक्तांसाठी अत्यंत सौम्य आहेत. त्यांचे तेज नेत्र सर्वांना संरक्षण व प्रकाश देतात.

**(४४) वाचस्पत्यो वाजसनो नित्यमाश्रमपूजितः।**
**ब्रह्मचारी लोकचारी सर्वचारी विचारवित्॥**
**अर्थ :** वाचस्पत्य वाणीचे स्वामी,
वाजसनो वेदमार्गाचे अनुयायी,
ब्रह्मचारी आत्मसंयमी,
लोकचारी समाजहितकर्ता,
विचारवित् गूढ तत्त्वज्ञ.
**भावार्थ :** शिव वाणी आणि ज्ञान दोन्हीचे अधिपती आहेत. ते ब्रह्मचर्याचे आदर्श आणि लोककल्याणाचे रक्षक आहेत. ते विचारवंत, योगी आणि समाजमार्गदर्शक आहेत.

**(४५) ईशान ईश्वरः कालो निशाचारी पिनाकवान। निमित्तस्थो निमित्तं च नन्दिर्नन्दिकरो हरिः॥**
**अर्थ :** ईशान सर्व दिशांचे अधिपती, ईश्वर विश्वनियंता, काल काळस्वरूप, पिनाकवान त्रिशूलधारी, नन्दी आनंददायी, नन्दिकर आनंद देणारे.
**भावार्थ :** शिव हे 'ईशान' रूपाने दिशा, काल व कर्म सर्वांचे नियंता आहेत. ते त्रिशूलधारी म्हणून धर्म, ज्ञान आणि क्रिया या तिन्ही तत्त्वांचा समन्वय करतात. त्यांचे नंदीस्वरूप भक्तांसाठी आनंदाचे दार आहे.

**(४६) नन्दीश्वरश्च नन्दी च नन्दनो नन्दिवर्धनः। भगहारी निहन्ता च कालो ब्रह्मा पितामहः॥**
**अर्थ :** नन्दीश्वर आनंदाचा स्वामी, नन्दिवर्धन सुखवृद्धी करणारे, भगहारी कामवासनेचा नाश करणारे, काल सर्वांचा नियंता, ब्रह्मा सर्जनकर्ते.
**भावार्थ :** शिव आनंदाचे स्रोत आहेत, पण त्यात संयम आहे. ते वासनांचा नाश करून आत्मानंद देतात. त्यांचे स्वरूप निर्माण, पालन आणि संहार या तिन्ही तत्त्वांचे केंद्र आहे.

**(४७) चतुर्मुखो महालिङ्गश्चारुलिङ्गस्तथैव च। लिङ्गाध्यक्षः सुराध्यक्षो योगाध्यक्षो युगावहः॥**
**अर्थ :** चतुर्मुख चार दिशांचा स्वामी, महालिंग सर्वोच्च ब्रह्मरूप, योगाध्यक्ष योगशास्त्राचा अधिपती, युगावह युगपरिवर्तन करणारा.
**भावार्थ :** शिवाचे लिंगरूप म्हणजे अनंत ब्रह्मतत्त्व. ते प्रत्येक युगात धर्माची पुनर्स्थापना करतात. ते योग, ध्यान आणि सृष्टीसंतुलनाचे अधिष्ठान आहेत.

**(४८) बीजाध्यक्षो बीजकर्ता अव्यात्माऽनुगतो बलः। इतिहासः सकल्पश्च गौतमोऽथ निशाकरः॥**
**अर्थ :** बीजाध्यक्ष सृष्टीबीजाचे रक्षण करणारे, बीजकर्ता सृजनाचे मूळ, अव्यात्मा निराकार ब्रह्म, निशाकर चंद्रसमान शीतल.
**भावार्थ :** शिव हे सृष्टीचे बीज आहेत आणि तिचे पालकही.
ते निराकार असूनही प्रत्येक रूपात विद्यमान आहेत.
त्यांचे तेज सूर्याचे, तर करुणा चंद्रासमान आहे.


**(४९) दम्भो ह्यदम्भो वैदम्भो वश्यो वशकरः कलिः। लोककर्ता पशुपतिर्महाकर्ता ह्यनौषधः॥**
**अर्थ :** दम्भो बाह्य दंभापासून मुक्त, वश्यो सर्वांचा नियंत्रक, पशुपति जीवांचे स्वामी, अनौषध ज्यांच्यासाठी औषधाची गरज नाही (स्वयंआरोग्यस्वरूप).
**भावार्थ :** शिव पशुपती आहेत म्हणजेच जीवात्म्यांचे रक्षणकर्ते. ते दंभहीन, सत्य आणि सर्वनियंता आहेत. ते आरोग्याचे मूळ आहेत .मन, बुद्धी आणि प्राण यांचे संतुलन करणारे.

**(५०) अक्षरं परमं ब्रह्म बलवच्छक्र एव च। नीतिर्ह्यनीतिः शुद्धात्मा शुद्धो मान्यो गतागतः॥**
**अर्थ :** अक्षर अविनाशी, परमं ब्रह्म सर्वोच्च सत्य, बलवद् प्रचंड शक्तिशाली, नीति धर्मस्वरूप, शुद्धात्मा निर्मळ आत्मा.
**भावार्थ :** शिव म्हणजे अक्षर ब्रह्म जे न कधी उत्पन्न होते न नष्ट. ते धर्म, न्याय, सत्य आणि प्रेम यांचे मूळ आहेत. ते निर्मळ आत्म्याचे प्रतीक ज्यांच्यात गत-अगत सर्व विलीन होते.
**भावसार :** या दहा नामांमध्ये शिवाचे सर्व तत्त्व दडलेले आहे. शक्ती आणि करुणा, संयम आणि आनंद, ज्ञान आणि वैराग्य यांचे अद्वितीय संतुलन.

**(५१) बहुप्रसादः सुस्वप्नो दर्पणोऽथ त्वमित्रजित् । वेदकारो मन्त्रकारो विद्वान्समरमर्दनः॥**

**अर्थ :** बहुप्रसाद अनंत कृपा करणारे, सुस्वप्न शुभ स्वप्न देणारे, दर्पण आत्मज्ञानाचा आरसा, वेदकार वेदांचे सर्जक, मन्त्रकार मंत्रांचा मूळ स्रोत,विद्वान सर्वज्ञ, समरमर्दन अधर्मविनाशक योद्धा.
शिव हे ज्ञान आणि कृपेचे महासागर आहेत.
ते वेदांचे स्रोत आहेत आणि मंत्रांना अर्थ देणारे तत्त्व. ते आत्म्याचे दर्पण आहेत ज्यात सत्याचे प्रतिबिंब दिसते.त्यांचा कोपही धर्मरक्षणासाठी असतो, विनाशासाठी नव्हे.

**(५२) महामेघनिवासी च महाघोरो वशीकरः। अग्निर्ज्वालो महाज्वालो अतिधूम्रो हुतो हविः॥**
**अर्थ :** महामेघनिवासी मेघरूपात विश्वावर वर्षा करणारे, महाघोर भयानक पण कल्याणकारी, अग्निर्ज्वाल तेजोमय, हुतो हविः यज्ञस्वरूप.
**भावार्थ :** शिवाचे तेज सूर्यसमान, परंतु शांततेने जळणारे आहे. त्यांचा "घोर" अर्थ भय नाही तर ऊर्जा आणि नूतनीकरण आहे. ते अग्नीप्रमाणे पवित्र करणारे आणि पर्जन्यासारखे जीवनदायी आहेत.



**(५३) वृषणः शङ्करो नित्यं वर्चस्वी धूमकेतनः। नीलस्तथाङ्गलुब्धश्च शोभनो निरवग्रहः॥**
**अर्थ :** वृषण धर्माचे प्रतीक वृषभधारी, शंकर कल्याणकारक, वर्चस्वी तेजस्वी, धूमकेतू नवीन युगाचे सूचक, शोभन सुंदर व मंगलकारी,निरवग्रह निर्लेप.
**भावार्थ :** शिव वृषभावर आरूढ आहेत कारण धर्म हा त्यांचा वाहन आहे. ते शंकर आहेत जे सर्वांचे कल्याण करतात. ते धूमकेतुप्रमाणे नव्या परिवर्तनाचे अग्रदूत आहेत.

**(५४) स्वस्तिदः स्वस्तिभावश्च भागी भागकरो लघुः। उत्सङ्गश्च महाङ्गश्च महागर्भपरायणः॥**
**अर्थ :** स्वस्तिद मंगल देणारे, स्वस्तिभाव शांतीचा भाव निर्माण करणारे, भागकर फळवितरण करणारे, महाङ्ग अनंत रूपधारी.
**भावार्थ :** शिव 'स्वस्ति'चा मूळ स्रोत आहेत. ते भक्तांना मानसिक व आध्यात्मिक शांती देतात. त्यांच्या स्पर्शाने जीवन मंगलमय होते, आणि ते सर्व जीवांचा आलिंगन करणारे आहेत.

**(५५) कृष्णवर्णः सुवर्णश्च इन्द्रियं सर्वदेहिनाम् ।**
**महापादो महाहस्तो महाकायो महायशाः॥**
**अर्थ :** कृष्णवर्ण रहस्यपूर्ण काळ्या तेजाने युक्त, सुवर्ण सूर्यप्रभेने झळकणारे, महापाद जगाचे आधार, महायश अनंत कीर्तीचे अधिपती.
**भावार्थ :** शिवात अंधार आणि प्रकाश दोन्ही आहेत. तेच रात्रीचे शीतलत्व आणि दिव्याचे तेज. त्यांचे रूप हे अनंत यश, कीर्ती आणि स्थैर्याचे प्रतीक आहे.

**(५६) महामूर्धा महामात्रो महानेत्रो निशालयः। महान्तको महाकर्णो महोष्ठश्च महाहनुः॥**
**अर्थ :** महामूर्धा उच्च चिंतनाचे प्रतीक, महानेत्र सर्वज्ञ दृष्टीचे धनी, महान्तक काळाचा अंत करणारे, महाकर्ण सर्वश्रवण करणारे, महाहनु प्रभावशाली वक्तृत्व.
**भावार्थ :** शिवाचे विशाल रूप विश्वचैतन्याचे आहे. त्यांची दृष्टी सर्वत्र व्यापलेली, श्रवण सर्व वेदांत आहे. त्यांचा आवाज म्हणजे "ॐ" विश्वाचा नाद.

**(५७) महानासो महाकम्बुर्महाग्रीवः श्मशानभाक। महावक्षा महोरस्को ह्यन्तरात्मा मृगालयः॥**
**अर्थ :** महानास दिव्य गंधग्राही, महाग्रीव उच्च विचारांचे धारक, श्मशानभाक् मृत्यूतत्त्वाचे ज्ञाता, अंतरात्मा प्रत्येक जीवात वास करणारे.
**भावार्थ :** शिव हे श्मशानवासी आहेत. कारण ते अनित्यतेचा संदेश देतात. ते अंतर्मनात वसलेले आहेत आणि आत्मज्ञानाने मृत्यूवर विजय मिळवितात. त्यांचे अंतःकरण करुणा व ज्ञानाचे मंदिर आहे.

**(५८) लम्बनो लम्बितोष्ठश्च महामायः पयोनिधिः। महादन्तो महादंष्ट्रो महाजिह्वो महामुखः॥**
**अर्थ :** महामाय सृष्टीमायेचे नियंता, पयोनिधि सागरासमान ज्ञानाचे गूढ, महाजिह्व सर्व शब्दांचे मूळ, महामुख सृष्टीच्या घोषाचे प्रतीक.
**भावार्थ :** शिव हे महामाया असूनही तिला नियंत्रित ठेवतात. त्यांच्या मुखातून निर्माण झालेला नाद म्हणजे वेदांचा आद्य स्वर. ते ज्ञान, सृष्टी आणि संहार या त्रिवेणीचे केंद्र आहेत.

**(५९) महानखो महारोमा महाकेशो महाजटः।**
**प्रसन्नश्च प्रसादश्च प्रत्ययो गिरिसाधनः॥**
**अर्थ :** महानख तेजोमय नखांचे प्रतीक, महाजट ज्ञानगंगा वाहणारी जटा, प्रसन्न शांतचित्त, प्रसाद कृपामय,गिरिसाधन कैलासस्थ योगिराज.
**भावार्थ :** शिवाचे जटाजूट म्हणजे ज्ञानगंगा आहे जी जीवनशुद्धीचे प्रतीक. ते प्रसन्न आहेत म्हणजे सहज कृपादायी. त्यांचा प्रसाद म्हणजे शांतता, संतुलन आणि अंतःशांती.

**(६०) स्नेहनोऽस्नेहनश्चैव अजितश्च महामुनिः।**
**वृक्षाकारो वृक्षकेतुरनलो वायुवाहनः॥**
**अर्थ :** स्नेहन स्नेहपूर्ण, अस्नेहन अलिप्त, अजित अजेय, महामुनि ध्यानसिद्ध योगी, वृक्षाकार विश्ववृक्षाचे रूप.
**भावार्थ :** शिव हे प्रेमळ पण अलिप्त आहेत स्नेह व वैराग्य यांचे संतुलन. ते अजिंक्य आहेत कारण त्यांनी अहंकारावर विजय मिळवला आहे. ते विश्ववृक्ष आहेत. सर्व जीवनाचे अधिष्ठान.
**भावसार :** या दहा श्लोकांत शिवाचे विश्वरूप आणि अद्वैत स्वरूप प्रकट होते. ते नित्य ज्ञान, संतुलन आणि मुक्तीचे प्रतीक आहेत. जे साधकाला शांती, सामर्थ्य आणि आत्मसाक्षात्काराकडे नेतात.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)